# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 24/08/2020 (सोमवार)

(दुपार)

---

### अवैधरीत्या शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 04 कि. मी. शिवमंदीर जवळ फुकटनगर कांद्री कन्हान येथे दिनांक 23/08/2020 चे 17:30 वा. ते 19:00 वा. दरम्यान फिर्यादी पो. हवा जोसेफ हे स्टाफसह पेट्रोलींग करीत असता पेट्रोलींग दरम्यान आरोपी नामे– परसुराम मख्खजु गौतम वय 29 वर्ष रा शिवनगर वार्ड क्र 04 कांद्री कन्हान हा संशयास्पद स्थितीत मिळुन आला. त्यास थांबवुन त्याची अंगझडती घेतली असता त्याचे जिन्स पॅन्टमधुन एक देशी बनावटीचे कटटा कि. 17,000/–रू व 4 जिवंत काडतुस किमती 2,000/–रू., तसेच त्याचे राहते घरी दोन तलवार किमती 8,000/–रू असा एकुण 27,000/–रू. चा मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातुन विनापरवाना मिळुन आला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे सफौ जोसेफ, पोस्टे. कन्हान यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 3, 25 भारतीय हत्यार कायदा सहकलम 135 महाराष्ट्र पोलिस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. नमुद आरोपीस अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री. मेश्राम 9067176694 हे करीत आहेत.

### गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– अंतर्गत 01 कि. मी. अंतरावर शिवधाम घाट येथे दिनांक 21/08/2020 चे 13.22 वा. दरम्यान फिर्यादी यांचे पती नामे– रविन्द्र मोरबाजी पौनिकर(मृतक), वय 55 वर्ष, रा. सालईधाबा यांचा अपघात झाल्याने ते हात व पायाने अपंग असुन दारू पिण्याचे सवयीचे होते. त्यामुळे फिर्यादी रोजमजुरी करुन दोघांचाही उदरनिर्वाह करायची दि. 22/08/2020 रोजी रात्री 11.00 वा फिर्यादी व तीचे पती जेवन करुन झोपी गेले. दि. 23/08/2020 रोजी सकाळी 06:00 वा. फिर्यादी झोपुन उठली तेव्हा तीचा पती (मृतक) हा घराचे लोखंडी खिडकीला साडीचे कपडयाने फाशी लावुन मृत अवस्थेत आढळुन आले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– मंगला रविंन्द्र पौनिकर वय 45 वर्ष रा.सालई धाबा खुशाल मुळे यांचे घरी किरायाने यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सफौ दांडेकर 8007109647 हे करीत आहे.

# अकस्मात मृत्यू

1) पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत मौजा गौराळा शिवार बोर नदीचे पात्रात येथे दिनांक 23/08/2020 चे 11.30 वा. ते 12.00 वा. दरम्यान कु. नंदीनी नागोराव नैताम, वय 12 वर्ष, रा. गौराळा हि नदीचे पात्रात आंघोळ करीत असतांना अचानक तिचा तोल गेल्याने पाय घसरून नदीच्या पाण्यात वाहात जाउन पाण्यात बुडुन तिचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– नागोराव चंपतराव नैताम, वय 57 वर्ष, रा. गौराळा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार सुनिल बन्सोड 9764090208 हे करीत आहे.

2) पो.स्टे. कुही :– अंतर्गत 8 कि. मी. मौजा आपतुर येथे दिनांक 22/08/2020 चे 17.30 वा. ते 18.00 वा. दरम्यान मारोती कवडु लेंन्डे, वय 27 वर्ष, रा. आपतुर ता. कुही यांने स्वतःचे घरी रूममध्ये विषारी औशध प्राषन करून छपरी मध्ये येवुन खाली पडला. त्याची प्रकृती खराब झाल्याने त्यास उपचारा कामी प्रथमिक उपचाराकरीता ग्रा.रू. उमरेड येथे नेले असता तेथील डॉक्टरांनी मृत घोषित केले. सदर मर्ग चे कागदपत्रे पो.स्टे. उमरेड येथुन 00/2020 कलम 174 जा.फौ. अन्वये पो.स्टे. कुही येथे प्राप्त झाल्यावरून सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– कवडु बापुराव लेंन्डे, वय 55 वर्ष, रा. आपतुर, ता. कुही यांचे रिपोर्टवरुन पो. स्टे. कुही येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार सुनिल बन्सोड 9764090208 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर